# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

## मा.स्थायी समिती सभा

## कार्यपत्रिका क्रमांक- २६०

## (सभावृत्तांत)

**दिनांक- ०२/०२/२०२२** **वेळ – दु.२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार, दिनांक **०२/०२/२०२२** रोजी **दु.०२.३०**वा. मा.अवर सचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.३ जानेवारी २०२२ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करण्यात आली आहे. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील व्हिडीओ कॉन्फरन्स रुम मधून मा.सभापती, स्थायी समिती यांनी सभा संचलित केली होती. सदर सभेत खालील प्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा.अॅड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे – सभापती**
२. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
३. मा.संतोष बबन कांबळे
४. मा.अभिषेक गोविंद बारणे
५. मा.बुर्डे सुवर्णा विकास
६. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.सुजाता सुनिल पालांडे
९. मा.भोईर सुरेश शिवाजी
१०. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
११. मा.यादव मिनल विशाल
१२. मा.भालेकर प्रविण महादेव
१३. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
१४. मा.पाडाळे निता विलास

याशिवाय मा.राजेश पाटील- आयुक्त, मा.ढाकणे- अति.आयुक्त(१), मा.जितेंद्र वाघ- अति.आयुक्त(२), मा.उल्हास जगताप- नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त(३), मा.भोसले- मुख्य लेखा परिक्षक, मा.कोळंबे- मुख्य लेखा अधिकारी, मा.नाळे- उपसंचालक नगररचना, मा.लोणकर, मा.खोत, मा.झगडे, मा.इंदलकर- उप आयुक्त, मा.पोमण-मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.सवणे- सह शहर अभियंता, मा.आगळे, मा.बहुरे, मा.देशमुख, मा.थोरात- सहाय्यक आयुक्त, मा.वाबळे- अधिष्ठता वायसीएमएच, मा.गट्टुवार, मा.सेठिया, मा.देसले, मा.खाबडे, मा.चव्हाण, मा.गायकवाड- कार्यकारी अभियंता, मा.जरांडे- मुख्य सुरक्षा अधिकारी हे अधिकारी उपस्थित होते.

------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले.

विषय क्र.२३) पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालयाकरीता असलेले र.रू.५,००,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख) स्थायी अग्रीमधन अधिष्ठाता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था, वाय.सी.एम. रूग्णालय यांचे नावे करणेबाबत.

विषय क्र.२४)मौजे पिंपरी वाघेरे स.नं. २९३ मधील यशवंतराव चव्हाण स्टेडीयम खालील व्यापारी गाळा क्र.६,७,८,,१०,व ११ दहा वर्षे कालावधी करीता भाडयाने देणे व भाडेकरारनामा करणेबाबत.

विषय क्र.२५)पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागात १ पशुवैद्यकीय अधिकारी, १ पशुवैद्यक, १ क्युरेटर व १ पशुशल्यचिकित्सकया अभिनामाचे पदावर दरमहा एकत्रित मानधनावर हंगामी (तात्पुरत्या) स्वरुपात ६ महिने कालावधीसाठी नियुक्ती करणेबाबत.

विषय क्र.२६)कासारवाडी टप्पा १,२, व ३ या प्रत्येक ४० द.ल.लि. क्षमतेचे मैलाशुध्दीकरण केंद्राचे चालन, देखभाल व दुरुस्तीचे कामकाज करणेबाबत.

विषय क्र.२७)हिंजवडी फेज २ येथे ई-बसेस चार्जिंग करणेकामी आवश्यक असणारी विद्युत यंत्रणा बसविणे कामी आवश्यक उच्चदाब विज पुरवठा उपलब्ध होणे कामी म.रा.वि.वि.कं. कडील कोटेशन प्रमाणे मराविवि कंपणीस र.रू.९७७९९४०/- अदा करणेबाबत.

विषय क्र.२८)प्रभाग क्र.१० मधील निसर्गकवी बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालयाची सुशोभीकरणाची व इतर स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे या कामासाठी प्रकल्प सल्लागार नेमणुकीबाबत.

विषय क्र.२९)इयत्ता १० वी प्रिलिम परीक्षा छपाई कामकाजाबाबत.

विषय क्र.३०)भाटनगर येथील मैलाशुध्दीकरण केंद्राची चालन, देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्र.३१)पिंपळे निलख येथील मैलाशुध्दीकरण केंद्राची (Biotower) चालन, देखभाल व दुरुस्ती करणे.

विषय क्र.३२)औंधरावेत बीआरटीएस रस्त्यावरील बस स्टॉप दुरुस्ती व स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.३३)भक्ती - शक्ती ते किवळे बीआरटीएस कॉरीडॉरमध्ये ठिकठिकाणी डेडीकेटेड लेन रेलिंग मार्गदर्शक फलक थर्मोप्लास्ट लेन मार्किंग पेंट व रंगरंगोटी इ.कामे करणे.

विषय क्र.३४)MDR-31 रस्त्याचे व पदपथांची देखभाल दुरुस्ती व इतर स्थापत्य विषयक अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.३५)बोपखेल फाटा ते आळंदी रस्त्यावरील स्टॉर्म वॉटर चेंबर्सची सफाई करणे व इतर स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे.

विषय क्र.३६)नाशिक फाटा पुलावर बी आर टी एस बस स्टेशन बांधणे.

विषय क्र.३७)प्रभाग क्र.७ भोसरी येथील विविध ठिकाणी पेव्हिंग ब्लॉक बसविणे, स्थापत्य विषयक व इतर अनुषंगिक कामे करणे.

विषय क्र.३८)वॉर्ड क्र.28 रहाटणी व पिंपळे सौदागर परिसरातील जलनि:सारण नलिका व चेंबर्सची किरकोळ देखभाल दुरुस्ती कामे करणे.

विषय क्र.३९)प्रभाग क्र.१२, ताम्हाणेवस्ती - त्रिवेणीनगर येथे स्थापत्य विषयक कामे करणे.

विषय क्र.४०)प्रभाग क्र.८ मधील विविध उदयानांची स्थापत्य विषयक दुरुस्तीची कामे करणे.

विषय क्र.४१)प्रभाग क्र.१० मध्ये आवश्यक असलेल्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमणुकीबाबत.-मा.भोईर सुरेश व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४२)पी.एम.पी.एल.ला निधी देणेबाबत.-मा. भोईर सुरेश व मा.बापू उर्फ शत्रुघ्न काटे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४३)सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील कामांवर तरतूद वर्ग करणेबाबत.-मा.भोईर सुरेश व मा.संतोष कांबळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४४)अ क्षेत्रीय कार्यालयाकडील अपुरी तरतूद असलेल्या कामांकरीता अंतर्गत वाढ घट करून तरतूद वर्गीकरण करणेबाबत.

विषय क्र.४५)सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील कामांच्या तरतूदीमध्ये वाढ घट करणेबाबत.-मा.अभिषेक बारणे व मा.कांबळे अंबरनाथ यांचा प्रस्ताव.

-----------

मा.स्थायी समिती सभा कार्यपत्रिका क्र.२५९ दि.२७/०१/२०२२ चा सभावृतात कायम करणेत आलेचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक- ११२६६ | विषय क्रमांक- ०१

दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- ब क्षेत्रीय

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.कार्यकारी अभियंता यांचे पत्र क्र.बक्षेका/५अ/कावि/३१/२०२२, दि.१८/०१/२०२२.

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे निविदा कामांच्या सोबतचे प्रपत्र 'अ' मधील (१ ते ३२) नियमानुसार व निविदा अटी-शर्ती प्रमाणे लघत्तम दराच्या निविदा स्विकारणेत आलेल्या असुन मंजुर दराने ठेकेदारास निविदा करारनामा करून कामाचा आदेश देण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२६७ | विषय क्रमांक- ०२

दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- अ क्षेत्रीय स्थापत्य्

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.अक्षे/स्था/कावि/०५/१२/२०२२, दि.२४/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

प्रभाग क्र.१५ लाल बहादूर शास्त्री चौक जवळील आरक्षति जागेवर नविन अग्निशामक केंद्र इमारत, वैद्यकीय सुविधा केंद्रासह(Medical Aid) बांधणे, या कामासाठी मे.अर्थस्केप आर्किटेक्ट्स ॲण्ड कंन्सल्टंट्स यांना वास्तुविशारद(Architect) यांचा निविदापुर्व + निविदापश्चात असा २.००% एकत्रित लघुत्तम दर व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार निविदापश्चात (Post-Tender) १.३५% लघुत्तम दर (जीएसटी वगळून) या दराने अदा करणेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२६८ विषय क्रमांक- ०३

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- मध्यवर्ती भांडार

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/८०/२०२२, दि.२२/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे कोरोना या ठिकाणी कोरोना विषाणुमुळे संसर्ग झालेल्या बाधित रुग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात. कोरोना रुग्णावर उपचारासठी आवश्यक असणारे Inj TociliZumab 80mg ची मागणी आहे तथापी आवश्यक त्या प्रमाणात पुरवठा होत नसल्याने मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचे आदेशान्वये मे.कुंदन एजंन्सी, चिंचवड यांचेकडुन 5 Vials थेट पध्दतीने र.रु.6482.64 (Tax Free) या दराने एकुण र.रु.32,413/- (अक्षरी र.रु. बत्तीस हजार चारशे तेरा फक्त)इतका खर्च येणार आहे. सदर खर्चास भारतीय साथरोग नियंत्रण अधिनियम १८९७, सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसुचना दि.१३/०३/२०२० व १४/०३/२०२० व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधिल कलम ४१ व ५०, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (६) व कलम ६७ (३) (क) तसेच महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५(२)(२) नुसार मे.कुंदन एजंन्सी, चिंचवड यांचेकडुन थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदीकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२६९ विषय क्रमांक- ०४

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- पर्यावरण अभियंत्रिकी

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पर्या/१०/कावि/९१/२०२२, दि.२४/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत मनपा क्षेत्रात पर्यावरण जनजागृतीकामी आकर्षक वॉल पेंटिंग,बोर्ड,फ्लेक्स बसविणे या कामास मा.महापालिका सभा ठराव क्र.५५३, दि.०४/०६/२०२० नुसार र.रु.१,००,००,०००/- इतकी प्रशासकीय मान्यता मिळालेली असुन मा.अतिरिक्त आयुक्त(२) यांचेकडील दि.१५/०१/२०२१ रोजीच्या मंजुर प्रस्तावान्वये र.रु.४२,०१,६२८/- पर्यंतचे निविदा कामाच्या खर्चास मान्यता मिळालेली आहे. तथापि, सदरच्या कामाच्या व्याप्तीमध्ये वाढ होत असल्याने माझी वसुंधरा

अभियान अंतर्गत मनपा क्षेत्रात पर्यावरण जनजागृतीकामी आकर्षक वॉल पेंटींग, बोर्ड, फ्लेक्स बसविणे या निविदा मंजुर कामाचे सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यास सुधारीत तांत्रिक मान्यता घेतली असता त्याची सुधारित निविदा र.रु.९९,८९,४७७/- इतकी येत आहे. तरी उपरोक्त बाबी विचारात घेता स्वच्छग्रही, स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ सर्व्हेक्षण २०२२ च्या जनजागृतीकरीता मनपाच्या मालकीच्या व सार्वजनिक ठिकाणच्या शहरातील विविध सीमाभिंतीवर आकर्षक पेंटींग करणे आवश्यक असलेने व या कामाची तातडी व आवश्यकता लक्षात ठेकेदार मे.ओम एंटरप्रायझेस यांचे सदर यापुर्वीचे मंजुर निविदा क्र.०७/०१, २०२०-२१ चे मुळ निविदा र.रु.४२,०१,६२८/- मध्ये वाढीव कामानुसार होणारी वाढ लक्षात घेता र.रु.९९,८९,४७७/- चे सुधारीत खर्चाच्या प्रस्तावास मान्यता असलेस सदरचे र.रु.५७,८७,८१९/- रकमेच्या वाढीव खर्चासह सुधारीत र.रु.९९,८९,४७७/- पर्यंत खर्चाचे निविदा स्विकृत दराने म्हणजेच Schedule-B पेक्षा ५.२०% कमी दराने ठेकेदाराकडून काम करुन घेणेकरिता सुधारीत करारनामा करुन घेणे व त्यापोटी येणा-या वाढीव खर्च र.रु.५७,८७,८१९/- पेक्षा ५.२०% कमी दराने येणारा खर्च र.रु.५४,८६,८५२/- + येणारी GST ची रक्कम आरोग्य मुख्य कार्यालयाकीडील “आरोग्य विषयक शासकीय योजनांच्या अंमलबजावणी व आरोग्य विषयक जनजागृती ”या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७० | विषय क्रमांक- ०५

दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- विद्युत

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ | अनुमोदक- मा.संतोष कांबळे

संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.जशुके/वि/१/८/२०२२, दि.२४/०१/२०२२.

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपा मार्फत शहरात सर्व ठिकाणी समान पाणी वाटप होण्याच्या दृष्टीने व पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेकरीता पिंपरी येथील (महिंद्रा अँण्ड महिंद्रा) कंपनीचे जागेवरील सदनिका व त्याजवळ असणा-या परिसरातील (कामगार नगर, गांधीनगर, व खराळवाडी) इत्यादी ठिकाणच्या पाणी वितरण व्यवस्थेकरीता २० लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची उंच टाकी (ESR) व संप वेल उभारण्याचे काम चालू आहे. सदर ESR भरणेकरीता ESR शेजारी नव्याने उभारणेत आलेल्या पंप हाऊस करीता नवीन उच्च दाब थ्री फेज विद्युत पुरवठा मिळणे करीता इकडील पत्र क्र.जशुके/वि/१/कावि/९९/१९ दि.२९/७/२०१९ अन्वये म.रा.वि.वि.कं. यांस मागणी करणेत आलेली होती. म.रा.वि.वि.कं. यांनी त्यांचेकडील सिस्टीम जनरेटेड इस्टीमेट/फर्म कोटेशन क्र.१३५०३४८१ दि.२९/०७/१९ अन्वये म.रा.वि.वि.कं. यांस अनामत रक्कम, करारनामा फी, प्रोसेसिंग फी,पर्यवेक्षण शुल्क व जीएसटी इ. असे एकूण र.रू.७,९०,२११/- पावती क्र.९९९८८२ दि.९/१/२०२० अन्वये यापुर्वी अदा करणेत आलेले आहे. तथापि म.रा.वि.वि.कंपनीने त्यांचेकडील नवीन सुधारीत इस्टीमेट क्र.SE/GKUC/T/06918 दि.२७/१२/२०२१ अन्वये म.रा.वि.वि. कं.यांस फरक(८,७६,७७६/-– ७,९०,२११/-=८६,५६५/-) असे र.रु.८६,५६५/- अदा करून, ३०० Sq.mm.ऐवजी ९५ Sq.mm.ची एच टी केबल व आर एम यु. वापरुन सदरचे काम म.न.पा मार्फत पूर्ण करणेबाबत कळविले आहे. तथापि सदरचे काम म.रा.वि.वि.कं. यांच्या

पर्यवेक्षणाखाली करणेत येत असल्याने वरील नमूद शुल्क म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणे आवश्यक आहे. सदर ठिकाणी तातडीने पंपींग यंत्रणा कार्यान्वित करणे आवश्यक असल्याने, वीज जोडणी करुन वीज पुरवठा तातडीने चालु करुन घेणे आवश्यक असलेने, सदर शुल्क र.रु.८६,५६५ पावती क्र.४२८५२२८ व ४२८५२२९ दि.२१/०१/२०२२ अन्वये म.रा.वि.वि.कं. यांस अदा करणेत आलेले आहे. सदर नवीन सुधारीत वीजपर्यवेक्षण व इतर शुल्क र.रु.८६,५६५/- (अक्षरी र.रु.शहाऐंशी हजार पाचशे पासष्ट फक्त) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७१ विषय क्रमांक- ०६
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- स्थापत्य फ मुख्य
सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/५९/२०२२, दि.२५/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67/10/2021-2022 अन्वये प्रभाग क्र १२ ताम्हाणेवस्ती त्रिवेणीनगर येथे स्थापत्य विषयक कामे करून पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.54,99,583/- (अक्षरी र.रु.चोपन्न लाख नव्व्यान्नव हजार पाचशे त्र्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.54,81,783/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.54,81,783/- पेक्षा 40.00% कमी म्हणजेच र.रु.32,89,070/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.778/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.17,800/- = एकुण र.रु.33,07,648/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७२ विषय क्रमांक- ०७
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- स्थापत्य फ मुख्य
सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/६०/२०२२, दि.२५/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.67/11/2021-2022 अन्वये प्रभाग क्र.१२, रुपीनगर येथिल अरुंद गल्यांमधील रस्ते पेव्हींग ब्लॉकने तयार करणे कामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.59,97,691/- (अक्षरी र.रु.एकोणसाठ लाख सत्त्यान्नव हजार सहाशे एक्क्यान्नव फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.59,81,091/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत.

त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.59,81,091/- पेक्षा 40.00% कमी म्हणजेच र.रु.35,88,655/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.1413/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,600/- = एकुण र.रु.36,06,668/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७३ विषय क्रमांक- ०८

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- ह क्षेत्रीय आरोग्य

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.हक्षेका/आ-५/कावि/८५/२०२२, दि.२७/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे ह क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील हॉटेल कलासागर ते शंकर मंदिरा पर्यंत १२० मीटर लांबी व रुंदी २० मीटर सी.डी वर्क बांधकाम केलेला नाला असून अनेक वर्ष सदरचा नाला साफ झालेला नाही त्यामुळे नाला, सांडपाण्यास मोरी मध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, चिंध्या व प्लॅस्टीक अडकले असल्याने पावसाळया मध्ये मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत असल्याने नाल्याचा प्रवाह व्यवस्थित होत नाही त्यामुळे पावसाचे पाणी साचून नागरीकांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर नाल्याची सफाई पावसाळया पूर्वी तातडीने करणे आवश्यक बाब असल्याने तसेच नाल्याचे आतील बाजूचे सफाईचे काम करणे धोक्याचे व जोखमीचे असल्याने सदर कामा करीता अनुभवी मे शुभम उद्योग या ठेकेदार संस्थेची नेमणूक करण्यात येऊन सदर संस्थे कडून दि.१३/०५/२०२१ पासून नाला सफाईचे कामास सुरुवात करुन घेण्यात आलेली आहे. महानगरपालिका अधिनियम कलम ६३(४) व कलम ६७(३) क नुसार तातडीची बाब व मागणीची आवश्यकता पाहता सदरचे काम महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (३)क नुसार व महापालिका अधिनियम अनुसुची प्रकरण ५ (२) (२) अन्वये थेट पध्दतीने मे शुभम उद्योग पिंपरी-१८ यांचे कडून करून घेणेस व त्यासाठी येणा-या र.रु.९,७८,७६०/-(अक्षरी र.रु. नऊ लाख आठयाहत्तर हजार सातशे साठ फक्त) चे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७४ विषय क्रमांक- ०९

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- माहिती व तंत्रज्ञान

सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे

संदर्भ- मा.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/३१८/२०२२,दि.२७/०१/२०२२.

मा.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्र.०६/२०२१-२२ नूसार, लघुत्तम निविदा धारक मे.इंदू इंन्फाटेक सोल्यूशन, भोसरी, पुणे. यांना दिनांक ६ डिसेंबर, २०२१ पासून एक वर्ष (बारा महिने) कालावधी करीता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे अधिकारी/ कर्मचारी यांची

बायोमेट्रिक पद्धतीने हजेरी नोंदविणेकामी आवश्यक असणारी बायोमेट्रीक फेस रिडींग व फिंगर प्रिंट मशिन देखभाल  द्‌रुस्ती करणेचे कामकाज र.रू.१५,२३,४४५/-(अक्षरी र.रु.पंधरा लाख तेवीस हजार चारशे पंचेचाळीस फक्त) (अधिक वस्त्‌ व सेवा कर) दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा -१२.५% ने कमी दराने देणेकामी त्यांचेसोबत दिनांक ६ जानेवारी, २०२२ रोजी कामाचा करारनामा करणेत आला असून मे.इंद्‌ इन्फाटेक सोल्यूशन यांना कामकाजाचा आदेश क्र.मातंवि/११/कावि/०३/२०२२ दि.०५ जानेवारी, २०२२ अन्वये निर्गत करण्यात आलेला असल्याने कामकाजाचा करारनामा व कामकाज आदेश यांचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७५ विषय क्रमांक- १०
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- माहिती व तंत्रज्ञान
सुचक- मा.संतोष कांबळे अनुमोदक- मा.अभिषेक बारणे
संदर्भ- मा.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांचे पत्र क्र.मातंवि/११/कावि/३१९/२०२२,दि.२७/०१/२०२२.
मा.माहिती व तंत्रज्ञान अधिकारी यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे माहिती व तंत्रज्ञान विभागाकडील निविदा सूचना क्रमांक १३/२०१९-२० नुसार, लघुत्तम निविदाधारक मे.टेक नाईन सर्व्हिसेस यांना ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत विकसित करणेत आलेल्या ३३ संगणक प्रणालींची देखभाल द्‌रूस्तीकामी मनुष्यबळ उपलब्ध करणेचे मुदतवाढ कामकाज आदेश क्र.मातंवि/११/कावि/२१७/२०२१ दि.२३/११/२०२१ अन्वये, दि.२४/०९/२०२१ पासुन दोन महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.२३/११/२०२१ पर्यंत मुदतवाढ देणेत आली होती. त्याचप्रमाणे व कामकाज आदेश क्र.मातंवि/११/कावि/१३२/२०२१ दि.१२/०८/२०२० नुसार, दि.२४/११/२०२१ पासून ३ महिनेकरिता अथवा नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही पुर्ण होऊन नवीन निविदाधारकांस कामकाज आदेश निर्गत होई पर्यंत मुदतवाढ देऊन दि.२२/०६/२०२० रोजीच्या करारनाम्यातील अटी शर्तीनुसार आवश्यक वाढीव मुद्रांक व अनामत रक्कम घेऊन दि.२४/११/२०२१ पासून तीन महिने कालावधीसाठी अथवा नवीन निविदा प्रक्रिया कार्यवाही पुर्ण होऊन नवीन निविदाधारकांस कामकाज आदेश निर्गत होई पर्यंत मुदतवाढ देऊन मे.टेक ९ सर्व्हिसेस यांचेमार्फत १२ संगणक डेव्हलपर नियुक्त करून संगणक प्रणाली देखभाल द्‌रुस्तीचे कामकाज करुन घेणेस व त्यासाठी येणा-या र.रू.१५,२३,८३२=५०(अक्षरी र.रु.पंधरा लाख तेवीस हजार आठशे बत्तीस, पैसे पन्नास फक्त) (अधिक वस्तु व सेवा कर) खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७६ विषय क्रमांक- ११
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- स्थापत्य ह मुख्य
सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा
संदर्भ- मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/ह-मुख्य/२७/२०२२, दि.२७/०१/२०२२.
मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.60/06/2021-22अन्वये प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर मधील वाय सी एम हॉस्पिटल मध्ये रंगरंगोटीची व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. (सन२०२१-२२) कामी मे.अक्षया एंटरप्रायजेस नि.र.रू.30,00,000/- (अक्षरी र.रु.तीस लाख फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.29,77,150/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत.

त्यानूसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.29,77,150/- पेक्षा 38.81%कमी म्हणजेच र.रु.18,21,718/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.2,263/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.22,850/- = एकूण र.रु.18,46,831/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानूसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनूसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानूसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानूसार फरकाची रक्कम अदा/ वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७७ विषय क्रमांक- १२
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- स्थापत्य इ मुख्य
सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/२६/२०२२, दि.२५/०१/२०२२.
मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.58/21/2021-22अन्वये प्रभाग क्र.०५ मधील अत्याधुनिक पध्दतीने रस्ते विकसीत करणे व स्थापत्य विषयक कामे करणे कामी मे.राहूल कन्स्ट्रक्शन नि.र.रू.73,92,445/- (अक्षरी र.रु.त्र्याहत्तर लाख ब्याण्णव हजार चारशे पंचेचाळीस फक्त) मधून रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.73,60,495/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानूसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.73,60,495/- पेक्षा 40.41%कमी म्हणजेच र.रु.43,86,119/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.40,097/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.31,950/- = एकूण र.रु.44,58,166 /- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानूसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तू व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनूसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानूसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानूसार फरकाची रक्कम अदा/ वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७८ विषय क्रमांक- १३
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- वायसीएमएच
सुचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक- मा.बुर्डे सुवर्णा

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/१५/कावि/४१/२०२२, दि.१५/०१/२०२२.
मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाचे सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकातील “स्थायी आस्थापना लेखाशीर्षावरील र.रु.६४,५०,००,०००/- मधून र.रु.१,५०,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख पंन्नास हजार फक्त) “महात्मा फूले जीवनदायी आरोग्य योजना” या लेखाशिर्षावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ अन्वये वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२७९ विषय क्रमांक- १४

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- सुरक्षा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/३८/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

मनपाचे सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.१/२०२०/२१ अन्वये मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस व मे.सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरिटी प्रा.लि ट्रॅफिक पोलिसांचे मदतीकरीता वाहतुक व्यवस्थेकामी **१७५** “ट्रॅफिक वार्डन” नियुक्ती कामकाजाचा कालावधी दिनांक १६/०३/२०२१ ते दिनांक २८/०२/२०२२ पर्यंत आहे. अदयापपर्यंत सदर संस्थांचे कामकाज चालु आहे. सदर संस्थांचा कामकाज कालावधी दिनांक २८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे.

| अ. क्र. | संस्था/एजन्सी/ठेकेदार/ नाव | “ट्रॅफिक वार्डन” | प्रति कर्मचारी प्रति माह एकूण वेतन | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| **१)** | मे. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस | ८८ | २३,६९२/- | ०१/०३/२०२२ ते २८/०२/२०२३ पर्यंत |
| **२)** | मे.सैनिक इंटेलिजन्स ऍ़ण्ड सिक्युरिटी प्रा.लि. | ८७ | २३,६९२/- | ०१/०३/२०२२ ते २८/०२/२०२३ पर्यंत |

सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरू आहे. पुढील एक वर्ष कालावधीकरिता मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नव्याने करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील एक वर्ष कालावधी करिता म्हणजेच दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ पर्यंत करारनामा करुन घेणे व कामकाज आदेश देणे तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील पत्र क्र.काक/३/कावि/५९/२०२१ दि.१७/०२/२०२१ व पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दि.१०/०८/२०२१ अन्वये नवीन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.६१६०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयातील मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस यांना र.रू.२,५०,१९,०००/- इतके रक्कमे पर्यत व मे.सैनिक इंटेलिजन्स एॅण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना र.रू.२,४७,३५,०००/- इतके रक्कमे पर्यत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८० विषय क्रमांक- १५

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- सुरक्षा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४०/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

मनपाचे सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.२/१-२०२०/२१ अन्वये मे.एम के फॅसिलिटीज सर्व्हीसेस प्रा.लि यांचे मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी ३२६ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दि.१६/०३/२०२१ ते दि.२८/०२/२०२२ पर्यंत आहे. अदयापपर्यत सदर संस्थेचे कामकाज चालु आहे. सदर संस्थेचा कामकाज कालावधी दि.२८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरु असुन पुढील एक वर्ष कालावधीकरिता मा.स्थायी समिती यांचे मान्यतेने नव्याने करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील एक वर्ष कालावधी करिता म्हणजेच दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ पर्यंत करारनामा करुन घेणे व कामकाज आदेश देणे तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील पत्र क्र.काक/३/कावि/५९/२०२१ दि.१७/०२/२०२१ व पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दि.१०/०८/२०२१ अन्वये नवीन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.६१६०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयातील मे.एम.के.फॅसिलिटीज सर्व्हीसेस प्रा.लि. यांना र.रू.९,२६,८४,०००/- इतके रक्कमे पर्यत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८१ विषय क्रमांक- १६

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- सुरक्षा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४१/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

मनपाचे सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.२/२-२०२०/२१ अन्वये मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस यांचे मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी ३३५ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दि.१६/०३/२०२१ ते दि.२८/०२/२०२२ पर्यंत आहे. अदयापपर्यत सदर संस्थेचे कामकाज चालु आहे. सदर संस्थेचा कामकाज कालावधी दि.२८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरु असुन पुढील एक वर्ष कालावधीकरिता मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नव्याने करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील एक वर्ष कालावधी करिता म्हणजेच दि.०१/०३/२०२२ ते

दि.२८/०२/२०२३ पर्यंत करारनामा करुन घेणे व कामकाज आदेश देणे तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील पत्र क्र.काक/३/कावि/५९/२०२१ दि.१७/०२/२०२१ व पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दि.१०/०८/२०२१ अन्वये नवीन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.६१६०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयातील मे. नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस यांना र.रू.९,५२,४२,०००/- इतके रक्कमे पर्यत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८२ | विषय क्रमांक- १७

दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- सुरक्षा

सुचक- मा.भोईर सुरेश | अनुमोदक- मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४२/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

मनपाचे सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र. २/३-२०२०/२१ अन्वये मे.सैनिक इंटेलिजन्स ऍन्ड सिक्युरिटी प्रा.लि यांचे मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी ३२३ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दि.१६/०३/२०२१ ते दि.२८/०२/२०२२ पर्यंत आहे. अदयापपर्यंत सदर संस्थेचे कामकाज चालु आहे. सदर संस्थेचा कामकाज कालावधी दि.२८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरु असुन पुढील एक वर्ष कालावधीकरिता मा. स्थायी समिती यांचे मान्यतेने नव्याने करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील एक वर्ष कालावधी करिता म्हणजेच दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ पर्यंत करारनामा करून घेणे व कामकाज आदेश देणे तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील पत्र क्र.काक/३/कावि/५९/२०२१ दि.१७/०२/२०२१ व पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दि.१०/०८/२०२१ अन्वये नवीन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.६१६०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयातील मे. सैनिक इंटेलिजन्स एॅण्ड सिक्युरिटी प्रा.लि. यांना र.रू.९,१८,३१,०००/- इतके रक्कमे पर्यत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८३ विषय क्रमांक- १८

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- सुरक्षा

सुचक- मा.भोईर सुरेश अनुमोदक- मा.शत्रुघ्न काटे

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.सुवि/३/कावि/४३/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

मनपाचे सुरक्षा विभागाकडील ई निविदा सुचना क्र.२/४-२०२०/२१ अन्वये मे.क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हीसेस प्रा.लि यांचे मनपाचे मिळकतींचे सुरक्षेकामी ३२१ रखवालदार मदतनीसांच्या कामकाजाचा कालावधी दि.१६/०३/२०२१ ते दि.२८/०२/२०२२ पर्यंत आहे. अदयापपर्यत सदर संस्थेचे कामकाज चालु आहे. सदर संस्थेचा कामकाज कालावधी दि.२८/०२/२०२२ रोजी संपुष्टात येणार आहे. सदर संस्थेचे कामकाज करारनाम्यातील अटी शर्तीनुसार सुरु असुन पुढील एक वर्ष कालावधीकरिता मा.स्थायी समिती यांचे मान्यतेने नव्याने करारनामा करणेत येऊन त्यानुसार कामाची नव्याने अनामत रक्कम घेणेत येऊन पुढील एक वर्ष कालावधी करिता म्हणजेच दि.०१/०३/२०२२ ते दि.२८/०२/२०२३ पर्यंत करारनामा करुन घेणे व कामकाज आदेश देणे तसेच कामगार कल्याण अधिकारी यांचेकडील पत्र क्र.काक/३/कावि/५९/२०२१ दिनांक १७/०२/२०२१ व पत्र क्र.काक/३/कावि/२२२/२०२१ दिनांक १०/०८/२०२१ अन्वये नवीन किमान वेतन दरानुसार अकुशल कामगारांचे मुळ वेतन र.रू.११,५००/- व महागाई भत्ता र.रू.६१६०/- प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन अदा करणेस व यापुढे जानेवारी व जुलैमध्ये होणा-या किमान वेतन वाढीस कामगार कल्याण विभागाने कळविल्याप्रमाणे प्रत्यक्ष त्या तारखेपासून दरवाढ लागू करणेस, कामकाजाचे आदेश देणेबाबत व त्यापोटी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषयातील मे. क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिसेस प्रा.लि. यांना र.रू.९,१२,६२,०००/- इतके रक्कमे पर्यत खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८४ विषय क्रमांक- १९

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- विद्युत मुख्य

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.विमुका/०८/कावि/९३/२०२२, दि.२७/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.**31-44/2021-2022** अन्वये मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील विद्युतीकरणाची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी, निविदा र.रु.34,02,143/- पेक्षा -19.05% कमी म्हणजेच र.रु.27,54,035/- (अक्षरी र.रु.सत्तावीस लाख चोपन्न हजार पस्तीस फक्त) या नुसार निविदा मंजूर दराने लघुत्तम दराचे ठेकेदार मे. टेक्नोवा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचेकडून काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच नियमानुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार

फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८५ | विषय क्रमांक- २०
दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- विद्युत मुख्य
सुचक- मा.सुजाता पालांडे | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.अति.आयुक्त(२) यांचे पत्र क्र.विमुका/०८/कावि/९४/२०२२, दि.२७/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(२) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या विद्युत विभागाकडील निविदा नोटीस क्र.33-01/2021-2022 अन्वये अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.14 आकुर्डी गावठाणमधील नविन हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन थिएटर मधील आवश्यक विद्युत विषयक व अनुषंगिक कामे करणेकामी, (निविदा र.रु.2,09,41,126/- पेक्षा -9.99% कमी) र.रु.1,88,49,108/- + GST (अक्षरी र.रु.एक कोटी अठ्ठयाऐंशी लाख एकोणपन्नास हजार एकशे आठ फक्त + GST) या नुसार निविदा मंजूर दराने लघुत्तम दराचे ठेकेदार मे.स्पीडफ्रोस्ट सर्व्हिसेस प्रा.लि. यांचेकडून काम करुन घेणेस निविदा अटीनुसार भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे या अटीस अधीन राहून त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८६ | विषय क्रमांक- २१
दिनांक- ०२/०२/२०२२ | विभाग- स्थापत्य ब मुख्य
सुचक- मा.सुजाता पालांडे | अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.शहर अभियंता यांचे पत्र क्र.स्था/नि/२-ब/३६/२०२२, दि.२८/०१/२०२२.

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.46/20/2021-22 अन्वये सन २०२१-२२ करिता प्रभाग क्र.१६ मधील रावेत भागातील शिंदेवस्ती परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणे. कामी M/s.MORYA BUILD GROUP नि.र.रू.2699485/- (अक्षरी र.रु.सवीस लाख नव्यान्नव हजार चारशे पंच्याऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.2665785/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.2665785/- पेक्षा 35.8% कमी म्हणजेच र.रु.1711434/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.11377/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.33700/- = एकुण र.रु.1756511/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक- ११२८७ विषय क्रमांक- २२
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- स्थापत्य उद्यान
सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- मा.अति.आयुक्त(१) यांचे पत्र क्र.स्था/नि/उद्यान/५२/२०२२, दि.२५/०१/२०२२.

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे.

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.70/42/2021-22 अन्वये प्रभाग क्र.१५ मधील दक्षिणमुखी मारुती उदयानाचे नुतनीकरण करणे.कामी MS.S.S.ENTERPRISES नि.र.रू.69,99,960/- (अक्षरी र.रु.एकोणसत्तर लाख नव्यान्नव हजार नऊशे साठ फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.69,83,410/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.69,83,410/- पेक्षा 36.24% कमी म्हणजेच र.रु.44,52,622/- +रॉयल्टी चार्जेस र.रु.30,915/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.16,550/- = एकुण र.रु.45,00,087/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक- ११२८८ विषय क्रमांक- २३
दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- वायसीएमएच
सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.भोईर सुरेश
संदर्भ- १)मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/१/कावि/२५/२०२२, दि.३१/०१/२०२२.
२)मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/भांडार/१/कावि/२६/२०२२,दि.०१/०२/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मा.आयुक्त यांचकडील सुधारीत आदेश क्र.प्रशा/२/कावि/७९७/२०१७,दि.०१/११/२०१७ अन्वये खरेदी ही मध्यवर्ती भांडार, मुख्य कार्यालयामार्फत करणेबाबत आदेशित केले होते. त्याप्रमाणे अंमलबजावणी सुरू आहे. कोरोना विषाणू अत्यावश्यक बाब म्हणून कामकाज कार्यक्षमतेने व जलद गतीने पार पाडण्यासाठी वित्तीय अधिकारात वाढ करणेस व इतर आकस्मिक खर्चाकरीता र.रू.५,००,०००/-(अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) व एका बिलाची खर्च मर्यादा र.रू.२५,०००/-(अक्षरी र.रू.पंचवीस हजार फक्त) करण्यास आदेश क्र.वायसीएमएच/भांडार/०३/कावि/५९/२०२१, दि.२३/०४/२०२१ अन्वये वायसीएम रूग्णालय येथील स्थायी अग्रीमधन र.रू.५,००,०००/-(अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) करणेकामी व एका बिलाची खर्च मर्यादा र.रू.२५,०००/-( अक्षरी र. रू. पंचवीस हजार फक्त) करणेस उप आयुक्त, मध्यवर्ती भांडार यांना मान्यता दिलेली आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाकरीता

आवश्यक असणारे सर्जिकल साहित्य/तातडीचे औषधे/वैद्यकीय उपकरणे/उपकरणे दुरूस्तीसाठी विविध पार्ट. Cooking gas, CO2 gas व Oxygen gas (O2) इत्यादी तातडीने उपलब्ध करून देणे तसेच कोविड-१९ अंतर्गत वायसीएम रूग्णालय व जंबो कोविडकरीता करावी लागणारी तातडीक खरेदी तसेच ऑक्सिजन जंबो सिलेंडर खुल्या बाजारातून उपलब्धतेनुसार व बाजारातील दरानूसार भरून घेणेकामी कराव्या लागणा-या खर्चाचा समावेश आहे. विभागप्रमुख, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय यांना आदेश क्र.प्रशा/२/कावि/१३१५/२०२१,दि.२५/१०/२०२१ अन्वये वित्तीय अधिकार प्रदान झाले असल्याने कार्यालयीन कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने स्थायी अग्रीमधनाची र.रू.५,००,०००/- (अक्षरी र.रू.पाच लाख फक्त) उप आयुक्त, मध्यवर्ती भांडारऐवजी विभागप्रमुख तथा अधिष्ठाता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालय यांचे नावे करणेस व त्यामधून पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयाची गरज लक्षात घेऊन तातडीने आवश्यक असणारे सर्जिकल साहित्य/तातडीचे औषधे/वैद्यकीय उपकरणे/उपकरणे दुरूस्तीसाठी विविध पार्ट. Cooking gas, CO2 gas वOxygen gas (O2) तसेच कोविड-१९ अंतर्गत वायसीएम रूग्णालय व जंबो कोविडकरीता करावी लागणारी तातडीक खरेदी तसेच ऑक्सिजन जंबो सिलेंडर खुल्या बाजारातून उपलब्धतेनुसार व बाजारातील दरानूसार घेणेस त्याचप्रमाणे आवश्यकतेनूसार कार्यालयीन स्टेशनरी/साहित्य, संगणक स्टेशनरी, संगणक साहित्य व इतर किरकोळ खर्च करणेस मान्यता देणेस तसेच सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये स्थायी अग्रीमधनातून होणारा खर्च मध्यवर्ती भांडार विभागाकडील “इतर खर्च” या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस विभागप्रमुख तथा अधिष्ठाता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालय यांना मान्यता देणेकामी व सन २०२२-२०२३ पासून पुढे स्थायी अग्रीमधनाचा खर्च करणेचे अधिकार विभागप्रमुख तथा अधिष्ठाता, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदव्युत्तर संस्था, वायसीएम रूग्णालय यांना देणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- ११२८९ विषय क्रमांक- २४

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- भूमि आणि जिंदगी

सुचक- मा.सुजाता पालांडे अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.भूजि/२/कावि/२३/२०२२, दि.३१/०१/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे.

मौजे पिंपरी वाघेरे स.नं.२९३ मधील यशवंतराव चव्हाण स्टेडीयम खालील व्यापारी गाळेधारकांना गाळे वितरीत केले त्यावेळेचे भाडे दर र.रू.२५००/- इतके होते. आणि आज रोजी सदर गाळ्यांचे भाडे दर र.रू.१२७५०/- इतके येत आहे. सदर भाडे वाढ अवाजवी असल्याची गाळेधारकांची तक्रार असून त्यामुळे ते भाडे भरण्यास तयार नाहीत. अति.आयुक्त-१ यांचे दालनात दि.९/११/२०२१ रोजी मौजे पिंपरी वाघेरे स.नं.२९३ मधील यशवंतराव चव्हाण स्टेडीयम खालील व्यापारी गाळ्यांचे भाडेदर कमी करणे बाबत बैठक आयोजित करणेत आली होती. सदर बैठकीमध्ये प्रथमदर्शनी तेथील

गाळेधारकांबरोबर चर्चाकरून ते किती भाडे भरणेस तयार आहेत हे जाणून घेणे बाबत सहाय्यक आयुक्त भूमि आणि जिंदगी विभाग व सहाय्यक आयुक्त ग क्षेत्रीय कार्यालय यांना सूचना देणेत आल्या होत्या. मनपाने गाळे वितरणाकामी निविदा मागविल्या असता सदर व्यापारी संकुलातील गाळ्यांकरीता निविदा नोटीस क्र.१/२०१८-१९ मध्ये गाळा क्र.३ करीता र.रू.४,०५,००९/- व निविदा नोटीस क्र.१/२०२०-२१ करीता गाळा क्र.५ करीता र.रू.८,०४,२००/- सर्वात जास्त दर प्राप्त झालेले आहे. अति. आयुक्त–१ यांनी सूचित केल्याप्रमाणे १२.५०% याप्रमाणे येणारे भाडेदर मान्य नसलेस नगर रचना कडील प्राप्त होणारे भाडेदर किंवा सर्वेक्षणा अंति मार्केट मधील प्राप्त होणारे भाडेदर यांचा ताळमेळ घेऊन भाडे निश्चित करून गाळेधारकांबरोबर चर्चा करून ते किती भाडे भरणेस तयार आहेत याबाबत सदर गाळेधारकांबरोबर दि.२२/९/२०२१ रोजी भाडे दराबाबत चर्चा केली असता गाळेधारकांनी सन २०२०-२१ निविदेमध्ये गाळा क्रमांक ५ साठी आलेला र.रु.८,०२,४००/- दर देण्याचे मान्य करून तसे लेखी पत्र याविभागास सादर केले आहे. तरी सदर गाळेधारकांकडून मार्च २०१७ अखेर संपूर्ण थकबाकी भरून घेऊन एप्रिल २०१७ पासून पुढील १० वर्षे कालावधी करीता मार्च २०२७ पर्यत ई-निविदा सूचना क्र.१/२०२०-२१ करीता गाळा क्रमांक ५ साठी आलेल्या र.रू.८,०२,४००/- या दराने देणेत यावेत व महाराष्ट्र महापालिका अधिनियम कलम १५२ मधील तरतुदी नुसार सन २०१७ पासून १२.५०% दराने करणेत आलेली भाडेवाढ निर्लेखित करून महाराष्ट्र महापालिका अधिनिय कलम ७९ ब नुसार सदर गाळे १० वर्षे कालावधी करीता एप्रिल २०१७ ते मार्च २०२७ पर्यंत एकरक्कमी रक्कम आकारून देणे बाबतचे विषयास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------

ठराव क्रमांक- ११२९० विषय क्रमांक- २५

दिनांक- ०२/०२/२०२२ विभाग- पशुवैद्यकीय

सुचक- मा.कांबळे अंबरनाथ अनुमोदक- मा.भोईर सुरेश

संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पवै/१/कावि/१०६/२०२२, दि.०१/०२/२०२२.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून.

